..........................................................................................................................

**वादीचा साक्षीदार क्र. १ आशा आव्हाड यांचा उलटतपास प्रतिवादी तर्फे ॲड. एम. बी. करडक यांचे मार्फत शपथेवर सुरुः**

मी खरेदी करुन घेतलेले क्षेत्र सरकारी मोजणी करुन ताब्यात घेतली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी खाजगी मोजणी करुन ताब्यात घेतले. मी खाजगी मोजणीचे अभिलेख प्रस्तुत प्रकरणात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जे क्षेत्र विकत घेतले त्या उता-यावर आजही सामाईकात नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रविण दत्तात्रय लोहकरे यांचे नाव आहे.

**प्रश्नः-** उता-यावर प्रविण लोहकरे यांचे नाव आहे, तर मग क्षेत्र खरेदी केल्यानंतर तुम्ही तुमचे क्षेत्र प्रविण लोहकरे यांचेविरुध्द दावा दाखल करुन ताब्यात घेतले का ?

**उत्तरः**- हे मला समजले नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी दावा दाखल केला त्यावेळी ७/१२ उता-यावर सोयाबीनची नोंद नाही. आता मला निशाणी ४१ वरील गट क्र. ३०८ चे ७/१२ उता-याची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. हे मी सांगु शकत नाही की, निशाणी ४१ वर सोयाबीनची नोंद लावली किंवा नाही.

मी दिनांक १४.०६.२०१७ रोजीच सदरचे क्षेत्र खरेदी घेतले. हे मला माहिती नाही की, ज्यावेळी मी गट क्र. ३०८ चे क्षेत्र खरेदी घेतले त्यावेळी त्यामध्ये हिस्से आहेत का याबाबत मी जाहिर नोटीस दिली. हे मला माहिती नाही की, सदरचे क्षेत्र खरेदी करत असताना त्यामध्ये कोणाचा हिस्सा आहे का याबाबत चौकशी केली अथवा नाही. हे मला सांगता येत नाही की, मधुकरला दत्तात्रय नावाचा अजुन एक भाउ होता. हे म्हणणे खरे आहे की, मधुकर शेती करत नव्हता व तो कायम अहमदनगर येथे राहत होता. हे मला माहिती नाही की, मधुकर हा अहमदनगर येथे राहत असल्यामुळे सदरचे संपुर्ण क्षेत्र दत्तात्रय लोहकरे वहिती करत होता. हे मी सांगु शकत नाही की, दत्तात्रय पहिले मयत झाला. हे मला माहिती नाही की, दत्तात्रयला प्रतिवादी क्र. १ व २, व तीन बहिणी नामे सुमन ज्ञानदेव चौधरी, निर्मला यशवंत येशेकर, जयश्री अशोक झुगे हे वारस होते. हे म्हणणे खरे नाही की, मधुकर नगर येथे राहत असल्यामुळे दत्तात्रय मयत झाल्यावर दत्तात्रयचे वारस सदरचे क्षेत्र सामाईकात वहिती करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदी केलेल्या क्षेत्रामध्ये मधुकर व दत्तात्रयचे वारस यांचा हिस्सा आहे. साक्षीदार पुन्हा सांगते की, दत्तात्रयचे वारस यांचा हिस्सा नाही परंतु मधुकरच्या वारसांचा हिस्सा होता. हे म्हणणे खरे आहे की, मधुकर व दत्तात्रयचे वारस यांनी वाटपासाठी रे.मु.क्र. ४२५/२०१८ हा दावा केला असुन त्यामध्ये मी पार्टी आहे. हे मी सांगु शकत नाही की, त्या दाव्याचे समन्स मला प्राप्त झाले असुन

त्यामध्ये मी हजर झाले आहे. हे मला माहिती  नाही की, प्रविणला आमच्या मिळकतीत येवु नये असा आदेश दिला किंवा नाही.

**प्रश्न:-** प्रस्तुत दाव्यामध्ये तुम्ही दावा मिळकतीचे तुम्ही खरेदीखताने मालक झाले आहात असा जाहिर ठराव मागितला का ?

**उत्तर:-** हा प्रश्न मला समजत नाही, कारण आम्ही दावा मिळकतीचे मालक आहोत.

**प्रश्न:-** दावा मिळकतीचे मालक आहेत हा जाहिर ठराव न्यायालयाकडुन मागावा लागतो हे तुम्हाला माहिती आहे का ?

**उत्तर:-** आम्ही दावा मिळकतीचे मालक आहोत, एवढेच मला माहिती आहे बाकी मला माहिती नाही.

**प्रश्न:-** दावा मिळकतीचे मालक आहोत असा ठरावा मागावा लागतो, असे वकील साहेबांनी सांगितले होते का ?

**उत्तर:-** हे सर्व माझे मालक बघतात.

हे म्हणणे खरे नाही की, दाव्याची माहिती मी वकीलांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर आमचा कब्जा नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की, या संपुर्ण दावा मिळकतीवर प्रतिवादींचा सामाईकात कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, या संपुर्ण मिळकतीमध्ये प्रतिवादी सह भागधारक व मालक आहेत. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, त्यांच्या हिस्स्यामध्ये आहेत, आमच्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यामध्ये व मनाई अर्जामध्ये प्रतिवादींनी हरकत अडथळा केला व जीवे मारण्याची धमकी दिली हा मजकुर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.08.02 17:26:47 +0530

(डॉ.पी.आर.सुगावकर)

दि. ०२/०८/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
नेवासा, ता. नेवासा, जि. अ.नगर